# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/३१८/२०१०/४५

तक्रार दाखल दिनांक :- १६/१२/२०१०
निकाल दिनांक :- १५/०२/२०११

श्री प्रेमचंद भिकचंद बाकलीवाल,
मु.पो. पुरी,
ता. गंगापुर, जिल्हा औरंगाबाद.

(ग्राहक क्र.५ एच.पी. ५०६६८००००४५१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही.बी.मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १६/१२/२०१० रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३०/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडून कृषी पंपाकरीता ५ अश्वशक्ती वीज भाराचा विद्युत पुरवठा घेतला आहे.ग्राहकाचा वीज पुरवठा डी. टी. सी. क्रमांक ४३९७५२४ वरुन देण्यात आला होता. वरील रोहीत्र दिनांक २३/०९/२०१० रोजी अचानक जळल्यामुळे नादुरुस्त झाले. व ग्राहकाचे कृषी पंपाचा वीज पुरवठा खंडीत झाला. ग्राहकाने वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबत प्रथम तोंडी दुरध्वनीद्वारे, व नंतर दिनांक ३०/०९/२०१० व दिनांक १५/१०/२०१० रोजी महावितरणचे संबंधित कार्यालयास लेखी तक्रारी दाखल केल्या. परंतु कंपनीने त्यांच्या तक्रारीची दखल घेतली नाही याउलट कनिष्ठ अभियंता शेदुरवादा यांनी त्यांचे पत्र दिनांक ०७/१०/२०१० नुसार थकीत वीज बिल बाकीची रक्कम रुपये २४२७०/- प्रथम भरावे व त्यानंतर तक्रारीची दखल घेण्यात येईल असे लेखी कळविले. वरील नादुरुस्त वीज रोहीत्रावर इतर वीज ग्रहकाचा वीज पुरवठा असल्याने तो देखील खंडीत झाला व त्यांनी सुध्दा कंपीनीच्या अधिका-यांना दिनांक १२/११/२०१० रोजी लेखी तक्रार दाखल केली आहे.त्यानंतर कंपनीचे कर्मचा-यांनी वरील नादुरुस्त वीज रोहीत्र दुरुस्तीकरीता काढुन नेले परंतु आजुन पर्यंत नवीन अथवा दुरुस्त रोहीत्र आणुन बसविले नाही.

२) वीज ग्राहकाने आपले तक्रारीमध्ये असे नमुद केले की, कनिष्ठ अभियंता शेंदुरवादा यांनी बाजुचे वितरण रोहीत्र क्रमांक ४३९७१९७ ( शांतीलाल डी.टी.सी.) वरुन तात्पुरती वीज जोडणी करुन घ्यावी असे सुचविले. ग्राहकाने वीज जोडणी कंपनी मार्फत करुन देण्याबाबत दिनांक ०३/१२/२०१० रोजी संबंधित कनिष्ठ अभियंत्यास विनंती केली असता आपणाकडे लाईमन उपलब्ध नसल्याने आपण स्वतः वीज जोडणी करुन घ्या व जोडणी केल्याबाबत लेखी अहवाल सादर करा असे सुचविले त्यामुळे ग्राहकाने दिनांक ०३/१२/२०१० रोजी बाजुच्या रोहीत्रावरुन तात्पुरती वीज जोडणी करुन घेवुन तसा लेखी अहवाल शेंदुरवादा येथील कनिष्ठ अभियंता यांना सादर केला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे कृती व मानकानुसार ग्रामीण भागातील वितरण रोहीत्रात बिघाड झाल्यास ते ४८ तासाच्या आंत बदली करणे गरजेचे आहे. ते न झाल्यास रुपये ५०/- प्रमाणे ग्राहकास नुकसान भरपाई देण्याचे आदेश मा.आयोगाने दिलेले आहेत. त्यामुळे विलंबाचा कालावधी दिनांक ०२/१०/२०१० रोजी दुपारी १.०० वाजेपासुन ते ०३/१२/२०१० चे दुपारी ३.०० वाजेपर्यत म्हणजे एकुण ६२ दिवस म्हणजेच एकुण १४९० तासाचे ५०/- प्रति तासाप्रमाणे रुपये ७४५००/- नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश कंपनीस देण्याबाबतची विनंती मंचास केली.ग्राहकाने त्यांला देण्यात आलेले वील देयक चुकीचे असुन ते दुरुस्त करुन देण्याबाबत विनंती मंचास केली होती. परंतु वरील बाबतीत पुरेशी कागद पत्रे या तक्रारीसोबत सादर न केल्यामुळे वीज बिल दुरुस्ती बाबत वेगळी तक्रार सादर करावी असे मंचाने सुचविल्यावरुन ग्राहकाने आपली तक्रार नादुरुस्ती रोहीत्र बदली करुन मीळणे व वरीलप्रमाणे नुकसान भरपाई मीळावी ऐवढीच सीमीत केली आहे.

३) वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०/१२/२०१०,१२/०१/२०११, व १५/०१/२०११ रोजी घेण्यात आली. दिनांक ३०/१२/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री अे.आर.पाटील व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी त्यांचा जबाब सादर करण्याकरीता पुढील तारीख देण्याबाबत विनंती मंचास केली. मंचाने सुनावणीची पुढील सुनावणी दिनांक १२/०१/२०११ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १२/०१/२०११ रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहक व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी त्यांचा लेखी जबाब सादर केला. त्यांच्या जबाबानुसार ग्राहकाचे वितरण रोहीत्र क्रमांक ४३९७५२४ दिनांक २३/०९/२०१० रोजी नादुरुस्त झाल्याने ग्राहकाने स्वतः दिनांक २५/०९/२०१० रोजी केबल टाकुण बाजुचे वितरण रोहीत्र क्रमांक ४३९७१९७ वरुन वीज पुरवठा सुरु करुन घेतला व तेव्हा पासुन ग्राहकाचा वीज पुरवठा सुरळीतपणे चालु आहे त्यामुळे ग्राहकाचे कोणतेही अर्थीक नुकसान झालेले नाही. वरीलबाबतीत त्यांनी कनिष्ठ अभियंता शेंदरवादा व तक्रार करते वीज ग्राहक यांचे शेताजवळ शेती असलेले दुसरे वीज ग्राहक श्री अशोक चंद्रभान गोरे गट क्रमांक ७० व श्री वसंत दशरथ गोरे यांचे बयान सोबत सादर केले. वीज ग्राहकाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जबाबावर आपले म्हणने मांडण्याकरीता पुढील तारीख देण्याची विनंती मंचास केली. मंचाने पुढील सुनावणी दिनांक १५/०१/२०११ रोजी ठेवली.

५) दिनांक १५/०१/२०११ रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहकाने आपले निवेदन सादर केले.दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

६) दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, वीज ग्राहकास विद्युत पुरवठा करणारे वितरण रोहीत्र क्रमांक ४३९७५२४ दिनांक २३/०९/२०१० रोजी नादुरुस्त झाल्यामुळे त्यांचे कुषी पंपाचा वीज पुरवठा खंडीत झाला. वरील बाबतीत ग्राहकाने लेखी तक्रार दिनांक ३०/०९/२०१० रोजी वीज वितरण कंपनीचे कार्यालय गंगापुर येथे सादर केल्याचे दिसुन येते. त्यानंतर वरील नादुरुस्त झालेले रोहीत्र दुरुस्ती करीता कंपनीने काढुन घेतले ते दुरुस्त करुन मीळाले नाही याबाबत ग्राहकाने दिनांक १५/१०/२०१० व २१/१०/२०१० रोजी महावितणचे कार्यालयात लेखी तक्रार दाखल केल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकाने कनिष्ठ अभियंता शेंदुवादा यांना दिनांक ०३/१२/२०१० रोजी सादर केलेल्या पत्रामध्ये गव्हाची पेरणी असत्यामुळे आपण शेजारी गट क्र.४ मधील रोहीत्रावरुन वीज पुरवठा चालु केल्याबाबत कळविले असल्याचे दिसुन येत आहे.नोडल अधिकारी यांनी आपले लेखी जबाबा सोबत कनिष्ठ अभियंता शेंदरवादा यांचा दिनांक १२/०१/२०११ रोजी घेतलेल्या जबाबाची प्रत सादर केली आहे. त्याचे जबाबानुसार वीज ग्राहकाने बाजुच्या शेतातील वीज रोहीत्रावरुन केबल जोडुन वीज पुरवठा जोडुन घेतल्याचा उल्लेख आहे. व त्यांनी पुरावा म्हणुन ग्राहकाचे मीटर पेटीची फोटो प्रत तसेच बाजुचे दोन शेतकरी श्री अशोक चंद्रभान गोरे व श्री दशरथ वसंत गोरे यांचा दिनांक २५/०९/२०१० रोजी घेतलेला लेखी जबाब त्यांनी सादर केला आहे. वरील दोन्ही शेतक-याच्या जबाबावरुन असे दिसुन येते की, तक्रार करते वीज ग्राहक यांनी दिनांक २५/०९/२०१० रोजी शेजारील रोहीत्रावरुन केबलद्वारे वीज पुरवठा सुरु करुन घेतला असुन त्यांचे शेतातील पिकाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

७) वरील प्रकरणामध्ये नियमा प्रमाणे ग्रामीण भागातील वितरण रोहीत्र नादुरुस्त झाल्यानंतर मा. आयोगाने दिलेल्या कृती व मानकानुसार नादुरुस्त रोहीत्र ४८ तासाच्या आत बदली करणे आवश्यक आहे परंतु नोडल अधिकारी यांनी नादुरुस्त झालेले रोहीत्र दोन महीन्यापैक्षा जास्त कालावधी झाल्यानंतरही का बदली करण्यात आले नाही याबाबत खुलासा आपल्या निवेदनात सादर केला नाही.तसेच ग्राहकाचे शेताजवळ दुसरे रोहीत्रावरील वीज पुरवठा उपलब्ध असतांना त्यांचा वीज पुरवठा तक्रार दाखल झाल्यानंतर कंपनीद्वारे त्वरीत सुरु करणे अवश्यक होते. परंतु कंपनीने त्यांचे तक्रारीची दखल न घेतल्यामुळे ग्राहकास स्वत; वीज पुरवठा जोडुन घ्यावा लागला. भारतीय विद्युत नियम २००५चे कलम ३६(२) नुसार कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस विद्युत लाईल किंवा उपकरणावर स्वतः काम करणे किंवा कामास मदत करण्यास प्रतिबंध केला आहे. फक्त अधिकृत वितरण परवाने धारक अथवा विद्युत निरिक्षक यांनी मान्यता दिलेल्या परवाधारक व्यक्तीच सुरक्षिततेची साधने वापरुन वीज वाहीनीवर काम करु शकतात. कनिष्ठ अभियंता यांनी वीज ग्राहकास स्वतः वीज पुरवठा दुस-या रोहीत्रावरुन जोडुन घेण्यास सुचविणे व वीज ग्राहकाने स्वतः वीज पुरवठा जोडुन घेणे या दोन्ही बाबी वरील वीज कायदयाचे उल्लंघन करणा-या आहेत. वीज ग्राहकाने स्वतः वीज पुरवठा जोडुन घेतल्याचे कनिष्ठ अभियंता यांना कळविल्यानंतरही कंपनीने त्यांची कोणतीही दखल घेलली नसत्याचे दिसुन येत आहे. कंपनीकडे असलेला कामाचा बोजा,वाढलेले दैनंदिन कामकाज व अपुरा कर्मचारी वर्ग यामुळे आपले कार्यक्षेत्रामधील प्रत्येक बाबीवर कनिष्ठ अभियंता लक्ष देवु शकत नाही व त्याचाच फायदा घेवुन काही विद्युत ग्राहक प्रत्यक्षात वेगळी कृती करतात असे नोडल अधिकारी यांनी आपले निवेदनामध्ये केलेले प्रतिपादन योग्य व नियमास धरुन नाही.

८) वरील प्रकरणामध्ये ग्राहकाने आपला विद्युत पुरवठा सुरु करुन घेतल्यामुळे त्याचे अर्थिक नुकसान झाले नाही याबाबतीत नोडल अधिकारी यांनी केलेले प्रतिपादन व पुरावे ग्राह्य धरुन कृती व मानकाप्रमाणे ग्राहकाने मागणी केलेली नुकसान भरपाई अमान्य करण्यात येत आहे.

# आदेश

१) ग्राहकाने दाखल कलेली तक्रार खरीज करण्यात येत आहे.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

२०१०/४५